# देगलूर महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त १८ तास वाचन उपक्रम

पेरीवाला। 17/04/23

देगलूर - येथील अडत व्यापारी शिक्षण संस्था संचलित देगलूर महाविद्यालयातील ग्रंथालय विभागाच्या वतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या निमित्ताने महाविद्यालयातील ग्रंथालयात दिनांक १३-०४-२०२३ रोजी सकाळी ०५:०० ते रात्री ११:०० पर्यंत सलग १८ तास वाचन उपक्रम आयोजित करण्यात आला.

प्रारंभी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहन खताळ यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

यावेळी उपप्राचार्य डॉ. अनिल चिद्रावार, ग्रंथपाल साईनाथ शिंदे, सहाय्यक ग्रंथपाल श्रीनिवास नाईक, भीम कर्णे, बालाजी गोविंदवार, रामराव माळेगावकर व महाविद्यालयातील विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.



या उपक्रमात महाविद्यालयातील विद्यार्थी व विद्यार्थिनी यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. महाविद्यालयातील ग्रंथालयात असलेली विविध पुस्तके वाचकांना वाचनासाठी उपलब्ध करून देण्यात आले. त्याचबरोबर वाचकांना नाश्ता, चहा व मध्यान्ह भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती.

या उपक्रमामुळे वाचन संस्कृतीला चालना मिळेल तसेच सध्याच्या काळामध्ये वाचन संस्कृती लोप पावत चालली आहे त्यामुळे समाजातील सर्व स्तरातून वाचन वाढविणे ही काळाची गरज आहे.

Scanned with OKEN Scanner